# **Press note**

गडचिरोली दि. ०१/०७/२०१७

## *पोलीस अधिक्षकांकडून झाली वृक्षारोपन अभियानास सुरुवात*

- *पोलीस मुख्यालय, पोस्टे, उपपोस्टे, पोमके परिसरात वृक्षारोपन*

महाराष्ट्र शासनाच्या वृक्षारोपन अभियानात पोलीस अधिक्षक कार्यालयाच्या वतीने पोलीस मुख्यालय परिसर तसेच जिल्हयातील सर्व पोस्टे, उपपोस्टे, पोमके येथे वृक्षारोपन अभियान राबवून वेगवेगळया झाडांचे वृक्षारोपन करण्यात आले. त्यामध्ये आवळा, चिंच, रेन ट्री, रिट्रा, कडूलिंब अशा वेगवेगळया प्रकारची झाडे लावण्यात आली. याचबरोबर पोलीस मुख्यालय परिसरात वृक्षदिंडी काढून जनजागृतीही करण्यात आली.

आज दिनांक ०१ जुलै २०१७ रोजी मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. महेंद्र पंडीत, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. हरी बालाजी, मा. पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गणेश बिरादार तसेच पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी वृक्षारोपन अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेवून वृक्षारोपन अभियान यशस्वी केले व झाडे जगविण्याचा संकल्प केला. तसेच जिल्हयातील सर्व पोस्टे, उपपोस्टे, पोमके यांनीही त्यांच्या परिसरामध्ये वृक्षारोपन केले.

त्याचबरोबर पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे हरित क्रांतीचे प्रणेते श्री. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन वंदन करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचारी हे उपस्थित होते.


वृक्षा रोपवन
मा. डॉ. अभिनव देशमुख
पोलीस अधिक्षक गडचिरोली
यांचे शुभ हस्ते वृक्षा रोपवन
दि.०१/०७/२०१७



